महाराष्ट्र वन विकास महामंडळ
<u>मर्यादित भाग भांडवल देणे.</u>
२०१५-१६ या आर्थिक वर्षात
अनुदान उपलब्ध करुन
देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्र. एफडीसी-२०१५/प्र.क्र. १०७ /फ-५

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक: ०३ फेब्रवारी, २०१६

<u>पहा:-</u> १) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्या. नागपूर यांचे क्रमांक एफए/बीजीटी/भागभांडवल/२०१४-१५/४३६, दि.२ मे, २०१५

२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५ /प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.१७/४/२०१५

३) शासन निर्णय क्रमांक एफडीसी-२०१५/प्र.क्र.१०७, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १४ मे, २०१५.

४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र. ८५/अर्थ-३, दि. १२ जानेवारी, २०१६

<u>प्रस्तावना:-</u>

राज्यातील संकीर्ण जंगलाचे उच्च प्रतीच्या मौल्यवान प्रजातीच्या रोपवनात रुपांतर करण्याच्या उद्देशाने १९७४ मध्ये कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडची स्थापना करण्यात येवून महामंडळास सुरुवातीस संपूर्ण अर्थसहाय्य शासनाने भागभांडवल अंशदान तसेच ऋण स्वरुपात पुरविले होते. १९९२-९३ पासून जागतिक बँकेच्या मदतीने महाराष्ट्र वानिकी प्रकल्पांतर्गत रोपवन व इतर अनुषंगिक कार्यक्रम राबविण्यात आले. त्यासाठी शासनाकडून ऋण तसेच अनुदान स्वरुपात महामंडळास अर्थसहाय्य देण्यात आले. मार्च २००० मध्ये महाराष्ट्र वानिकी प्रकल्प संपुष्टात आल्यानंतर महामंडळाच्या वन प्रकल्प विभागासाठी मंजूर व्यवस्थापन आराखडयानुसार विरलन, कापणी, तसेच रोपवन निर्मिती व रोपवन देखभाल यासारखी वनिकी विकासाची कामे महामंडळाकडून राबविण्यात येत आहेत.

२. सुरुवातीच्या आर्थिक व्यवस्थेप्रमाणे रोपवन कार्यक्रमाच्या भांडवली खर्चासाठी संपूर्ण अर्थसहाय्य शासनाने १९८०-८१ पर्यंत ऋण / भागभांडवल स्वरुपात पुरविले आहे. १९८१-८२ पासून रोपवन निर्मिती व देखभालीचा कार्यक्रम नाबार्ड वित्तीय व्यवस्थेशी सलग्न करण्यात आला.या व्यवस्थेतील शर्ती व अटीप्रमाणे एकूण प्रकल्प खर्चापैकी २० टक्के भाग भांडवल शासनाने पुरवावयाचे होते व उर्वरीत ८० टक्के रक्कम ऋण स्वरुपात बँकाकडून अपेक्षित होती. सद्यस्थितीत शासनाचे जून्या रोपवन कार्यक्रमाचे ऋण व नाबार्ड ऋणाची व्याजासह संपूर्ण परतफेड झाली असली तरी महामंडळाचे अंतर्गत स्त्रोत मर्यादित असल्याने २० टक्के भागभांडवल महाराष्ट्र शासनाकडून असून, ८० टक्के खर्च अंतर्गत स्त्रोतातून भागविण्याचे आहे.

शासन निर्णयः-

सन २०१५-१६ करिता महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांना भागभांडवल देणे या योजनेकरिता रु. २५.०० लक्ष निधी अर्थसंकल्पीत आहे. सदरहू योजनेसाठी शासन निर्णय संदर्भ क्र. ३ येथील दिनांक १४ मे, २०१५ नुसार एकूण १२.२५ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

वित्त विभागाचे संदर्भ क्र. ४ येथील दिनांक १२ जानेवारी, २०१६ च्या परिपत्रकानुसार सन २०१५-१६ चा उर्वरीत कालावधी, वितरीत कालावधी व त्याचा झालेला विनियोग पहाता आता योजनेत्तर अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ८५% एवढी विहित करण्यात आली आहे. तसेच योजनांतर्गतसाठी पूर्वीचीच मर्यादा तशीच ठेवण्यात येत आहे. तसेच डिसेंबर, २०१५ च्या पुरक मागण्यांच्या निधी वितरणाची मर्यादा ५०% निधी वितरीत करण्यास प्रशासकीय विभागांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनामध्ये सदरहू योजनेसाठी रु.७.५० लक्ष इतका निधी पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या दिनांक १२ जानेवारी, २०१६ च्या परिपत्रकातील तरतूदीनुसार सदरहू योजनेसाठी रु.३.७५ लक्ष इतका निधी वितरीत व खर्च करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा खर्च मुख्य लेखाशिर्ष -मागणी सी-१०, ४४०६ वनिकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च (योजनांतर्गत) ०१-वनीकरण १९०-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर अंगीकृत उपक्रमांतील गुतवणूक (००) (०१) महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित भाग भांडवल सविस्तर शिर्ष ५४-गुंतवणूक (४४०६-०१९८) या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता यावी. तसेच निधी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात खर्ची टाकण्यात यावा.

सदरचा शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र. ८५/अर्थ-३, दिनांक १२ जानेवारी, २०१६ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०४१२२२४६१६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

DHAS ANIL N

Digitally signed by DHAS ANIL N
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917247, postalCode=400032, st=Maharashtra, cn=DHAS ANIL N
Date: 2016.02.04 12:22:38 +05'30'

(अनिल धस)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थ संकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. महालेखपाल (१ व २) (लेखापरिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
६. कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
७. कक्ष अधिकारी, (ब-१), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
८. कक्ष अधिकारी, (फ-२), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
९. निवड नस्ती (फ-५), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२